N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी  **P.S.(ठाणे):** खेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0251  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/08/2023 17:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 17/02/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/02/2023

**Time From (वेळेपासून):** 10:38 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/08/2023  **Time (वेळ):** 17:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/08/2023 17:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 50 मी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसीलदार कार्यालय खेड,ता खेड जि रत्नागिरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विजय महादेव मोरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सध्या रारुम नं 2, 794, विक्,पार्क साईट, हनुमान नगर, पारसना,गोसावी चाळ, हुनमान मंदीराजवळ, ,पश्चिम, मुंबई-400079,खेड,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सध्या रारुम नं 2, 794, विक्,पार्क साईट, हनुमान नगर, पारसना,गोसावी चाळ, हुनमान मंदीराजवळ, ,पश्चिम, मुंबई-400079,खेड,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल महावीर पाटील | | | 1. तलाठी सजा शिवतर, ,ताखेड, जिरत्नागिरी,खेड,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 28/08/2023

मी विजय महादेव मोरे, वय 45 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी, सध्या रा.रुम नं. 2, 794, विक्रोळी पार्क साईट, हनुमान नगर, पारसनाथ गोसावी चाळ, हुनमान मंदीराजवळ, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-400079. मुळ रा. मु.पो.शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी. मोबाईल नं. 7506588349 फिर्याद लिहून देतो की,

माझे मुळ गाव मौजे शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे असुन मी माझे नोकरीनिमित्त वर नमुद मुंबई येथील पत्यावर माझे कुटुंबासह राहणेस आहे. सध्या मी ठाणे येथील खाजगी कंपनीमध्ये काम करत आहे. मौजे शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे आमची वडिलोपार्जित जमिन आहे. त्या जमिनीचे गट नं. 126, 1140, 1465, 761 व 923 असे आहेत. त्या जमिनी माझे चुलते जयसिंग गणपत मोरे व माझे वडील कै.महादेव गणपत मोरे यांचे नावावर आहेत. माझे वडील कै. महादेव गणपत मोरे हे दिनांक 12/11/2014 रोजी मयत झालेले असुन त्यांचे मृत्यु पच्च्यात त्यांचे जमिन मिळकतीचा वारस तपास होवुन माझे नाव दाखल करण्यासाठी मी दिनांक 16/02/2023 रोजी श्री.अमोल पाटील, तलाठी यांची तलाठी सजा शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी यांची भेट घेतली असता श्री.पाटील यांनी त्या कामासाठी माझ्याकडे 1,000/- रुपयांची मागणी केली होती. श्री.अमोल पाटील हे मागत असलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने व त्यांना लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी माझा भाऊ श्री.राजाराम नलावडे यांस सांगितले. तेव्हा त्यांनी त्यांचेकडे श्री.अनंत कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचा नंबर असल्याचे मला सांगितले व लगेचच त्यांनी त्यांचे मोबाईल नंबर वरुन पोनि कांबळे यांना कॉल करुन माझे व पोनि श्री.कांबळे यांचेशी बोलणे करुन दिले व मी त्यांना लाचेच्या मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. सदर तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.अनंत कांबळे यांनी मला दिनांक 17/02/2023 रोजी सकाळी 09.30 वाजता खेड येथे येण्याबाबत सांगितले. दिनांक 17/02/2023 रोजी मी सकाळी खेड येथे हजर असताना पोनि कांबळे यांनी मला फोन करुन खेड रेल्वे स्टेशन-भोस्ते रोडवरील एका निर्जनस्थळी येण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी त्या ठिकाणी 09.30 वाजता हजर राहिलो.

सदर ठिकाणी हजर असलेले पोनि कांबळे यांनी त्यांची ओळख सांगुन माझी ओळख करुन घेतली. तसेच त्यांचेसोबत असणारे शासकीय पंच व अ.सी.बी. स्टाफ यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगुन, माझे स्वःहस्ताक्षरामध्ये वरील हकिकती प्रमाणे माझा तक्रारी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे पोनि कांबळे यांचे समक्ष हजर केली. पोनि कांबळे व पंचांनी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर तसेच त्यासोबत सादर केलेल्या कागदांवर सहया केल्या. तक्रारी अर्ज व सोबतचे कागदपत्र पोनि कांबळे यांनी ताब्यात घेतले.

मी श्री.अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर यांची तहसीलदार कार्यालय खेड येथे भेट घेणार असल्याचे पोनि कांबळे यांना सांगितले. त्यामुळे सदर तक्रारीची पडताळणी करण्यासाठी मला पंचासह तहसीलदार कार्यालय खेड येथे पाठवणार असल्याचे व सदर भेटीदरम्यान माझे व श्री.अमोल पाटील यांचेतील संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोनि कांबळे यांनी मला व पंचांना सांगितले.

पोनि कांबळे यांनी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नवीन सीलबंद मेमरी कार्ड हजर केले. सदरचे मेमरी कार्ड त्यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर त्यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पोनि कांबळे यांनी मला व पंच नं. 1 कदम यांना लोकसेवकाची भेट झाल्यानंतर पुन्हा खेड रेल्वे स्टेशन-भोस्ते रोडवरील निर्जनस्थळी परत येण्याच्या सुचना दिल्या. पोनि कांबळे यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून

माझ्या शर्टच्या आत बनियन मध्ये लपविला. त्यानंतर मी पंच कदम यांचे खाजगी मोटार सायकलने पडताळणीकामी श्री.अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर यांची भेट घेण्याकरीता तहसीलदार कार्यालय खेड येथे जाणेकरीता रवाना झालो. उर्वरीत पडताळणी पथक खेड रेल्वे स्टेषन-भोस्ते रोडवरील निर्जनस्थळी शासकीय वाहनामध्ये थांबुन होते. मी व पंच कदम यांचे खाजगी मोटार सायकलने तहसीलदार कार्यालय खेड येथे गेलो. लोकसेवक पाटील तहसीलदार कार्यालयात उपस्थित नसल्याने मी माझे मोबाईल नं. 7506588349 वरुन लोकसेवक पाटील यांचे मोबाईल नं. 7022402926 वर फोन करुन मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी मी तहसीलदार ऑफीसला आलेलो असल्याचे सांगुन मला थांबुन राहण्यास सांगितले व मी दहा ते पंधरा मिनीटात ऑफिसला येत असल्याचे मला सांगितले. त्यांनी मला नाव विचारले असता मी त्यांना माझे नाव सांगितले व लोकसेवक पाटील यांनी फोन कट केला. त्याप्रमाणे मी व पंच कदम असे तहसीलदार कार्यालयात लोकसेवक पाटील यांची वाट पाहत थांबलो होतो. काही वेळाने लोकसेवक पाटील तहसीलदार कार्यालयात आले व मी त्यांची भेट घेतली. आमचेत कामासंबंधात बोलणे चालु असताना मी लोकसेवक पाटील यांना ''सातबाऱ्याचे किती'' असे विचारले असता लोकसेवक पाटील यांनी ''किती सातबारे आहेत..? पंधरा तरी असतील ना'' असे सांगितले. त्यावर मी ''होय'' असे सांगितले त्यानंतर लोकसेवक पाटील यांनी ''तीनशे रुपये सातबाऱ्याचे'' असे सांगितले. त्यावर मी ''आणि तुमच काय..पटकन जावून घेवुन येतो'' असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी ''बर ते एक तीनशे रुपये दिलेत'' असे सांगितले. त्यावर त्यांनी ''हा..'' असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी ''वर ते एक पाचशे रुपये द्या आणि अॅड्रेस फक्त मला लिहुन द्या बहिणींचे अस कर...'' असे मला सांगितले. त्यावर मी ''ओके चालेल'' असे सांगितले व अॅड्रेस व्हाटसअप नंबरवर पाठविणार असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर माझेकडे असलेला महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 149 नुसार अधिकार संपादन करावयाच्या अर्जाचा नमुना व सत्यप्रतिज्ञालेख असा विहीत नमुन्यातील मुळ अर्ज लोकसेवक पाटील यांनी माझेकडुन घेतला सदर अर्जाची छायांकित प्रत मी माझेकडे ठेवुन घेतली. त्यानंतर लोकसेवक पाटील यांनी एका कागदावर माझी सही व माझ्या आईची सही म्हणुन माझा अंगठा घेतला व तो कागद त्यांनी स्वतःकडे ठेवुन घेतला. त्यानंतर मी लोकसेवक पाटील यांना आत्ताच द्यायला लागतील का असे विचारले असता लोकसेवक पाटील यांनी हो असे सांगितले. त्यावेळी मी भाऊ पैसे घेवुन येत असल्याबाबत त्यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी बहिणींना घेवुन या असे सांगितले त्यावेळी मी त्यांना कधी आणु असे विचारले असता लोकसेवक पाटील यांनी फोन करुन या असे सांगुन सातबाऱ्याचे तीनशे रुपये आता जमा करा असे मला सांगितले. त्यावेळी मी तीनशे रुपये घेवुन येतो असे सांगितले. त्यावेळी मी फोन करतो तुम्हाला असे सांगितले असता लोकसेवक पाटील यांनी मला चार पर्यंत येण्यास सांगुन, तीन-चार नंतर फोन करण्यास सांगितले. त्यावर मी ठिक आहे असे सांगुन कार्यालयाचे बाहेर निघुन आलो. कार्यालयाचे बाहेर आल्यानंतर मी व पंच कदम असे त्यांचे मोटार सायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यावेळी पोनि कांबळे यांनी माझे जवळील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. पोनि कांबळे यांनी मला घडलेली हकिकत विचारली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकिकत सांगितली. माझेत व लोकसेवक पाटील यांचेत समक्ष भेटीदरम्यान झालेले संभाशण ज्या डिजिटल व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झाले, तो डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लाऊडस्पिकर ऑन करून मी, पंचांनी व पोनि कांबळे यांचेसह पडताळणी पथकाने त्यातील संभाशण ऐकले. त्यावेळी मी माझा, लोकसेवक पाटील यांचा आवाज ओळखला.

लोकसेवक अमोल पाटील हे 300/- रुपये सातबारा उताऱ्यांचे शासकीय फि म्हणुन लगेचच स्विकारणार असल्याचे व लाच रक्कम 500/- रुपये पुढील भेटीच्या वेळी बहिणी सहिकरीता येतील त्यावेळी स्विकारणार असल्याचे पडताळणीमध्ये निश्पन्न झालेले होते. त्यामुळे सातबारा उताऱ्यांची शासकीय फि म्हणुन मागितलेली रक्कम 300/- रुपये घेवुन मला व पंच नं. 1 कदम यांना तहसीलदार खेड कार्यालयात पाठविण्यात येणार असल्याचे पोनि कांबळे यांनी आम्हास सांगितले. पोनि कांबळे यांनी मला 300/- रुपये हजर करण्यास सांगितले असता मी 100/- रुपये दराच्या 3 नोटा हजर केल्या. सदरच्या नोटा पोनि कांबळे यांनी माझे शर्टचे वरील डावे खिषात ठेवण्यास सांगितल्या. तसेच लोकसेवक पाटील व माझेमध्ये होणारे संभाषण हे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे आम्हास सांगितले. त्याप्रमाणे पोनि कांबळे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो माझे षर्टचे आतील बनियानमध्ये लपविला. त्यानंतर मी पंच कदम यांच्या खाजगी मोटार सायकलने लोकसेवक पाटील यांची तहसीलदार कार्यालय खेड येथे सातबारा उताऱ्यांची शासकीय फि 300/- रुपये देण्यासाठी रवाना झालो. उर्वरीत पडताळणी पथक खेड रेल्वे स्टेषन-भोस्ते रोडवरील निर्जनस्थळी थांबुन होते.

मी व पंच कदम असे दोघे मोटार सायकलने तहसीलदार कार्यालय खेड येथे गेलो व लोकसेवक पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी मला 'किती रुपये' असे विचारले असता मी 'तीनशे रुपये' असे सांगितले. त्यावर

लोकसेवक पाटील यांनी 'म त्यांना बोलवुन घ्या' असे बोलुन 'अजुन पाचशे द्या...तुमच सगळ क्लिअर करुन टाकतो...माझ मीच ते अ◌ॅड्रेसना पाठवतो' असे मला सांगितले. त्यावर लोकसेवक पाटील यांनी याल तेव्हा द्या असे सांगितल्याने मी मोजकेच पैसे आणले असल्याचे सांगुन बहिणींना घेवुन येईन तेव्हा देईन असे सांगितले. त्यावर लोकसेवक पाटील यांनी मला कधी येतील, पुढच्या महिन्यात का? असे विचारले असता मी हा पुढच्या महिन्यात असे सांगितले. त्यावर लोकसेवक पाटील यांनी चालेल असे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक पाटील यांना ''हे तीनशे तर घ्या'' असे म्हणुन मी माझे शर्टचे वरील डावे बाजूचे खिषातील 300/- रुपये त्यामध्ये 100/- रुपये दराच्या 3 नोटांची घडी काढुन लोकसेवक पाटील यांचे समोर धरली असता लोकसेवक पाटील यांनी ''द्या'' असे म्हणुन सदरचे 300/- रुपये सातबारा उताऱ्यांचे शासकीय फि म्हणुन स्विकारले. त्यानंतर मी लोकसेवक पाटील यांना सातबारा उताÚयाबाबत विचारले असता लोकसेवक पाटील यांनी सातबारा उतारे माझे कामाला जोडणार असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक अमोल पाटील यांनी पुन्हा पाचशे रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणीमध्ये निश्पन्न झालेले आहे. त्यानंतर मी षिमग्याला बहिणींना घेवुन येतो सांगुन कार्यालयातुन बाहेर निघुन आलो व पंच कदम देखील माझे मागोमाग कार्यालयाचे बाहेर आले. त्यानंतर मी व पंच कदम असे मोटारसायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे संभाशण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे.

त्यानंतर मी पोनि कांबळे, पंच व अ◌ेसीबी स्टाफ यांना सांगितले की, मी माझ्या तीन्ही बहिणींना एकत्र येवून शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे येवून लोकसेवक पाटील यांची भेट घेईन त्यावेळी लोकसेवक अमोल पाटील हे पाचशे रुपये लाच रक्कम स्विकारतील असे सांगितले व पुढील सापळा कारवाई बहिणींना घेवुन आल्यानंतर करण्यात येणार असल्याचे ठरले त्याप्रमाणे मी पोनि कांबळे यांना फोन करुन येईन असे सांगितले होते. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात येवुन पोनि कांबळे यांनी पंचांस, मला व अ◌ेसीबी स्टाफ यांना सदर घटनेबाबत गोपनीयता राखणेबाबत सूचना दिल्या व मी तेथुन निघुन गेलो.

त्यानंतर मी दिनांक 02/07/2023 रोजी माझे मुळ गावी मौजे शीवतर येथे येणार असल्याचे पोनि कांबळे यांना फोन करुन सांगितले होते. त्याप्रमाणे पोनि कांबळे यांनी दिले सुचनेप्रमाणे मी दिनांक 03/07/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.अतिरिक्त सत्र न्यायालय खेड समोरील खेड-शीवतर रोडवर उपस्थित असलेल्या पोनि कांबळे यांची भेट घेवुन त्यांनी पंच व अ◌ेसीबी स्टाफची ओळख करुन दिली. पोनि कांबळे यांनी मला लोकसेवक अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर हे कोठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझ्या विष्वासु मित्रास फोन करुन माहिती घेतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी माझे विष्वासु मित्रास फोन करुन लोकसेवक पाटील यांची माहिती घेतली असता त्याने मला तलाठी सजा शीवतर कार्यालयास कुलुप असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पोनि कांबळे, पंच व सापळा पथकास लोकसेवक अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर हे खेड तहसीलदार कार्यालयात भेटतील असे सांगितले. म्हणुन पोनि कांबळे यांनी मला, पंचांस व सापळा पथकास तहसीलदार कार्यालय खेड येथे सापळा कारवाईकामी पाठविणार असल्याचे सांगितले.

पोनि कांबळे यांनी माझेकडे लाच रक्कम हजर करण्यास सं◌ागितले. त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम रुपये 500/- त्यामध्ये 100/- रूपये दराच्या 5 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर पोनि कांबळे यांनी एका कागदावर लिहून काढले. पोनि कांबळे यांच्या सुचनेवरून माझी पंच नं. 1 रेपाळ यांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर अंगझडतीत मिळुन आलेल्या चिजवस्तु व रोख रक्कम मला परत दिल्या.

मा.अतिरिक्त सत्र न्यायालय खेड समोरील खेड-शीवतर रोडवर थांबून असलेल्या ठिकाणी शासकिय वाहनात पोनि कांबळे यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अ◌ॅन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता, त्या वस्तूवर अ◌ॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर शासकिय वाहनात काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविले त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.

पोनि कांबळे यं◌ाच्या सूचनेवरून पोलीस हवालदार नलावडे यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविले. नोटा अगर त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर अ◌ॅन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकिय वाहनात काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून पोलीस हवालदार नलावडे यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोनि कांबळे यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अ◌ॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोलीस हवालदार

नलावडे यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोलीस हवालदार नलावडे यांनी 100/- रुपये दराच्या 5 भारतीय चलनी नोटांची घडी करुन माझे शर्टचे डावे बाजूचे खिषात ठेवली. त्यावेळी मला पोनि कांबळे यांनी सूचना दिली की, लोकसेवक पाटील हे लाच रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत सदर लाच रक्कमेला हात लावू नये असे सांगितले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोनि कांबळे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी लोकसेवक पाटील यांची लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकाडमध्ये ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कांबळे यांनी सापळा कारवाई करीता जात असल्याबाबतचे स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

त्यानंतर पोनि कांबळे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझे शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. मी व पंच रेपाळ असे चालत खेड तहसीलदार कार्यालयात जाणेसाठी रवाना झालो. उर्वरीत सापळा पथक देखिल चालत खेड तहसीलदार कार्यालयाचे आवारात कोणासही संषय येणार नाही अषा रितीने थांबुन होते. मी व पंच रेपाळ खेड तहसीलदार कार्यालयाचे आत गेलो व काही वेळातच मी खेड तहसीलदार कार्यालयाचे बाहेर येवून पंच रेपाळ यांचेसह व उर्वरीत पोनि कांबळे, पंच नं. 2 गायकवाड व सापळा पथक देखिल खेड तहसीलदार कार्यालय खेड येथून निघुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि कांबळे माझेकडील डि.व्ही.आर. काढुन ताब्यात घेवुन तो बंद केला. पोनि कांबळे यांनी माझेकडे चैकशी केली असता मी त्यांना लोकसेवक पाटील हे खेड तहसीलदार कार्यालयात हजर नसल्याचे सांगितले. पोनि कांबळे, पंच व सापळा पथकाने डि.व्हि.आर.चे सहाय्याने मेमरी कार्डवर ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरला कॉड लावून व स्पिकर ऑन करुन ऐकले.

त्यानंतर मी पोनि कांबळे, पंचांस व सापळा पथकास सांगितले की, लोकसेवक अमोल पाटील यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करुन ते कोठे आहेत याबाबत विचारणा केल्यास ते कोठे आहेत याबाबत सांगितल्यानंतर ते असले ठिकाणी त्यांची भेट घेता येईल असे सांगितले. म्हणुन पोनि कांबळे यांचे सुचनेवरुन मी माझे मोबाईल नंबर 9833704608 वरुन लोकसेवक अमोल पाटील यांना त्यांचे मोबाईल नंबर 7022402926 वर कॉल केला व मी माझे नाव त्यांना सांगितले. परंतु नेटवर्क खराब असल्यामुळे सदरचा कॉल कट झाला. परंतु लगेचच लोकसेवक अमोल पाटील यांनी त्यांचे मोबाईल नंबर 7022402926 वरुन माझे मोबाईल नंबर 9833704608 वर कॉल करुन माझे नाव विचारले व त्यांनी मला माझे सातबारा उताऱ्याचे माझे प्रलंबित असलेले काम पूर्ण झालेले असल्याचे सांगुन सातबारा उतारे ऑनलाईन चेक करण्यास सांगितले व त्यांनी माझा फोन कट केला. लोकसेवक पाटील यांनी सांगितलेनुसार मी माझे सातबारा उतारे ऑनलाईन चेक करुन पाहिले असता माझे सातबारा उताÚयावरुन माझे वडीलांचे नाव कमी होवुन त्याऐवजी माझे स्वतःचे व बहिणींचे नावे सातबारा उतारे झाले असल्याचे दिसुन आले.

मला लोकसेवक पाटील यांचेकडे जाणेस उशीर झाल्याने व लोकसेवक अमोल पाटील यांना माझा संशय आलेला असल्याने व माझे सातबारा उताऱ्याचे काम पूर्ण झालेले असल्यामुळे लोकसेवक पाटील भविश्यात माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत अशी माझी खात्री झाल्याने मी लोकसेवक अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी यांनी दिनांक 17/02/2023 रोजी माझेकडे केलेल्या 500/- रुपये लाचेच्या मागणीबाबत मी दिनांक 03/07/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी कार्यालयाकडून पुढील योग्य ती कारवाई होणेबाबत विनंती केलेली आहे. श्री.अमोल पाटील यांचे पुर्ण नावाबाबत माहिती घेता त्यांचे पुर्ण नाव श्री. अमोल महावीर पाटील असे असल्याचे समजुन आलेले आहे.

तरी माझे वडील कै.महादेव गणपत मोरे यांचे मृत्यु पश्च्यात त्यांचे जमिन मिळकतीचा वारस तपास होवुन माझे नाव दाखल करण्यासाठी श्री.अमोल पाटील, तलाठी सजा शीवतर यांनी माझेकडे तहसीलदार कार्यालय खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे दिनांक 17/02/2023 रोजी 10.38 ते 11.32 या वेळेत 300/- रुपये शासकीय फि व 500/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन दिनांक 17/02/2023 रोजी 12.08 ते 12.33 या वेळेत 300/- रुपये शासकीय फि स्विकारुन पुन्हा माझेकडे 500/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन श्री.अमोल महावीर पाटील, तलाठी सजा शीवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी यांचे विरुध्द माझी फिर्यादं आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहीला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Nitin Pandurang Bhoyar(I (Inspector)) / DGPNPBM7302 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Nitin Pandurang Bhc
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** DGPNPBM7302

पोलीस स्टेशन ऑफिसर
खेड,पोलीस ठाणे (रत्नागिरी)